**अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे**
२ रा मजला, सिंचन भवन, बारणे रोड, मंगळवार पेठ, पुणे-४११०११
☎ ०२०-२६१२ ६९४१, २६१२६२८९ (टेलिफॅक्स) Email: sepicpune@gmail.com

जा.क्र. पुपामं/प्रशा-२/ ४०२ /२०१९ दिनांक: १४/१/२०१९

# आदेश क्र. ५८ सन २०१९

विषय:- **पुणे महानगरपालिकेचा सन २०१८-१९ मधील उर्वरीत कालवधीसाठी बिगर सिंचनाचा पाण्याचा हक्क (Bulk Water Entitlement ) मंजुर करण्याबाबत ....
(कालावधी दि.१५.१.२०१९ ते दि.३०.६.२०१९)**

संदर्भ:- १) शा.नि.क्र.संकीर्ण-२००४/(३९५/०४)/सिंव्य(धोरण) दि.२८.३.२००५
२ ) म.ज.नि.प्रा.आदेश क्र.९/२०१७ दि.२२.९.२०१७
३) म.ज.नि.प्रा.आदेश क्र.१/२०१८ दि.११.१.२०१८.
४) मंडळ कार्या.पत्र जा.क्र.पुपामं/प्रशा-२/६३५/९५७४/२०१७ दि.११/१२/२०१७
५) मंडळ कार्या.अ.शा.पत्र क्र.पुपामं/सिंचन मुदका/०१/२०१८ दि.०३/०१/२०१८
६) म.ज.नि.प्रा.मुंबई यांचे आदेश No.MWRRA/२०१८/Legal Case No.४ (२०१८)/९२९ दि.१७.१२.२०१८.
७) मंडळ कार्यालयाचे अ.शा. पत्र क्र.पुपामं/प्रशा-२/१५९/२०१८ दि.२०.१२.२०१८.
८) मंडळ कार्यालयाचे अ.शा. पत्र क्र.पुपामं/प्रशा-२/१६७/२०१८ दि.२९.१२.२०१८.
९) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१८/(५११/२०१८)/सिंव्य(धो) दि.१.१२.२०१८.

विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र.१ चे शासन निर्णयान्वये पुणे महानगरपालिकेस ३२५.४५ दलघमी (११.५० टीएमसी ) पाणी आरक्षण शासनाच्या उच्चाधिकार समितीमार्फत दि.२८.३.२००५ अन्वये मंजूर आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधीकरणाच्या संदर्भ क्र.२ व ३ च्या आदेशानुसार पुणे म.न.पा.चे पाणी वापराचे अंदाजपत्रक (Water budget) तात्काळ सादर करणेबाबत या मंडळाचे संदर्भ क्र.४ व ५ अन्वये विनंती केलेली होती तथापी पुणे महानगरपालिकेने पाणी वापराचे अंदाजपत्रक (Water budget) सादरा केलेले नाही.

पुणे महानगरपालिकेच्या जास्तीच्या पाणीवापराबाबत मा.प्राथमिक विवाद निवारण अधिकारी तथा मा.मुख्य अभियंता (जसं), पुणे यांनी दिलेल्या आदेशाच्या विरोधात पुणे महानगरपालिकेने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधीकरणाकडे अपिल याचिका दाखल केलेली होती. सदर याचिकेवर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधीकरणाने संदर्भ क्र.६ अन्वये निर्णय दिलेला आहे. त्यामध्ये महानगरपालिकेस वार्षिक ११.५० टीएमसी (८९२ एमएलडी) च्या मर्यादेतच पाणी वापर अनुज्ञेय केलेला आहे व पुणे म.न.पा.स वार्षिक पाणी वापराचे अंदाजपत्रक (Water budget) तात्काळ सादर करण्याचे प्राधिकरणाने निर्देश दिलेले आहेत.

Scanned by CamScanner

तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधीकरणाचे संदर्भ क्र .६ च्या आदेशातील निर्देशाप्रमाणे वार्षिक पाणी वापराचे अंदाजपत्रक (Water budget) सादर करणे बाबत संदर्भ क्र.७ व ८ अन्वये पुणे म.न.पा.स कळविण्यात आलेले होते.तथापी पुणे म.न.पा.ने अदयापही वार्षिक पाणी वापराचे अंदाजपत्रक (Water budget) सादर केलेले नाही.

**संदर्भ क्र.९ च्या शासन निर्णयातील अ.क्र.३ वरील निर्देशानुसार बिगर सिंचन पाणी वापर कर्त्यांना पाणी आरक्षण (Bulk Water Entitlement ) हे म.ज.नि.प्रा.च्या दि.२२.९.२०१७ च्या आदेशात नमुद केलेल्या निकषाप्रमाणे अथवा वेळोवेळी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधीकरणाने दिलेले निर्देश /बदलाप्रमाणे मुजुर करण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत.**

**पुणे महानगरपालिकेने वेळोवेळी सादर केलेल्या लोकसंख्येमध्ये वारंवार बदल करुन लोकसंख्या कळवित असल्याचे म.ज.नि.प्रा.च्या दि.१७.१२.२०१९ च्या आदेशात अ.क्र.११ (i) पृष्ठ क्र.१३ वर नमुद केलेले आहे.सदर आदेशात नमुद केलेनुसार पुणे म.न.पा.च्या लोकसंख्येच्या पाणीवापराच्या वर्गवारीनुसारच्या निकषाप्रमाणे (उदा. Regular household water supply, community stand Posts, Water Provided through Tankers, Floating Population (With and without bathing facility), Village water Supply-Outside corporation limits thr.Stand post and piped water supply etc.) तसेच औदयोगिक पाणी मागणी इत्यादी तपशिलासह पुणे म.न.पा.ने वार्षिक पाणी वापराचे अंदाजपत्रक (Water budget) सादर करणे आवश्यक आहे.**

**पुणे महानगरपालिकेने अदयापही वार्षिक पाणी वापराचे अंदाजपत्रक (Water budget) सादर केलेले नसल्याने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधीकरणाचे संदर्भ क्र .६ च्या आदेशातपुणे महानगरपालिकेस अनुज्ञेय केलेल्या वार्षिक ११.५० टीएमसी (८९२ एमएलडी) च्या मर्यादेतच सन २०१८-१९ मधील उर्वरीत कालावधीसाठी (कालावधी दि.१५.१.२०१९ ते दि.३०.६.२०१९) पुणे महानगरपालिकेस संदर्भ क्र.९ च्या शासन निर्णयातील निर्देशाप्रमाणे खालीलप्रमाणे बिगर सिंचनाचा पाण्याचा हक्क (Bulk Water Entitlement ) मंजुर करण्यात येत आहे .**

| अ.क्र. | पुणे मानगरपालिकेस वार्षिक मंजुर पाणी आरक्षण (टीएमसी) | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधीकरणाचे संदर्भ क्र .६ च्या आदेशानुसार वार्षिक पाणी वापराची मर्यादा (टीएमसी) | बिगर सिंचनाचा पाण्याचा हक्क (Bulk Water Entitlement ) (कालावधी दि.१५.१.२०१९ ते दि.३०.६.२०१९ साठी) | |
|---|---|---|---|---|
| | | | टीएमसी | एमएलडी |
| १ | ११.५० | ११.५० | ५.२३ | ८९२ |

**वरील पाणी वापराच्या मर्यादेतच पाणी वापर करण्यात यावा .**

C:\Users\Admin\Desktop\PMC Lett\Lett to Gov with DA Dt.7.1.2019\Lett For PMC Entitlement Dt.14.1.2018.doc

Scanned by CamScanner

**या आदेशाच्या दिनांकानंतर पुणे महानगरपालिकेने सादर केलेलया वार्षिक पाणी वापराचे अंदाजपत्रक (Water budget) नुसार अनुज्ञेय पाणी वापर जर वरील मर्यादेपेक्षा कमी असल्यास त्यानुसार वार्षिक पाणी वापर अनुज्ञेय राहील.**

Ghopade
(सं.द.चोपडे )
अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे.

प्रत : मा.कार्यकारी संचालक महाराष्ट कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे यांना माहीतीसाठी सविनय सादर

प्रत : मा.मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत : मा. आयुक्त,पुणे महानगरपालिका, पुणे यांना माहीतीसाठी व उचित कार्यवाहीसाठी .

प्रत :मा. मुख्य अभियंता ,पाण पुरवठा विभाग,पुणे महानगरपालिका पुणे यांना माहीतीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.

प्रत :कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांना माहीतीसाठी व प्रत्यक्ष कार्यवाहीसाठी.



Scanned by CamScanner